**संच : अ**

# शिक्षकांसाठी सूचना तिसरी : मराठी

## पायाभूत चाचणी : २०१७-१८

**इयत्ता - तिसरी**

**विषय : मराठी**

**लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : ३०**

**प्रश्न १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र** : लेखन (श्रुतलेखन)

**उद्दिष्ट** : जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना** :
- यादीतील शब्द सांगताना मोठ्याने वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्याला शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द :**

| | |
|---|---|
| १) भाकर | २) दर्शन |
| ३) शिकारी | ४) रात्र |
| ५) दुपार | ६) नक्कल |
| ७) फैलाव | ८) झेंडा |
| ९) पोस्ट | १०) कॉलर |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**

हा प्रश्न तपासताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'फैलाव' ऐवजी 'फइलाव' किंवा 'शिकारी' ऐवजी 'शीकारी'/ शीकारि असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २ ते ४ साठी) हा उतारा वाच आणि खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान :**

**प्रश्न २) ब)** बॅग (गुण १)

**प्रश्न ३)** पैसे खर्च न करता ते पेटीत साठवत असत/दोघांचेही पन्नास-पन्नास रुपये जमले होते. या पैकी कोणतेही एक वाक्य लिहिल्यास. (गुण २)

**प्रश्न ४) क)** शाळा सुटल्यानंतर. (गुण २)

**प्रश्न ५) चौकटीत लपलेल्या कोणत्याही पाच फळांची नावे शोधून लिही.** (गुण ५)

उदा. आंबा, अननस, केळी, नारळ, पपई, पेरू, संत्री.

यापैकी कोणत्याही पाच अचूक उत्तरास गुणदान करावे. ('मोसंबी' या शब्दासाठी गुणदान करू नये.)



***Runa Graphics :*** *Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 3/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

# संच : अ

**प्रश्न ६)** रवी आंबा खातो. (गुण १)

**प्रश्न ७)** माझ्याकडे चार गोट्या होत्या/आहेत. (गुण १)

**प्रश्न ८)** आज शाळेत चित्रकला, कथाकथन व रांगोळी स्पर्धा आहेत. (गुण १)
(चित्रकला नंतर स्वल्पविराम व आहेत नंतर पूर्णविराम दिल्यास प्रत्येक विरामचिन्हाला अर्धा गुण याप्रमाणे एक गुण.)

**प्रश्न ९) 'पटपट' शब्दाचा वापर केलेले कोणतेही अर्थपूर्ण वाक्य असल्यास एक गुण द्यावा.** (गुण १)

**प्रश्न १०) 'खेळणे' या शब्दाचे योग्य रूप वापरून वाक्य लिहिलेले असल्यास एक गुण द्यावा.** (गुण १)

**प्रश्न ११) कामाबद्दल पाच प्रश्न विचार. ते खाली दिलेल्या जागी लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** लेखन

**उद्दिष्ट :** हा प्रश्न मुलांचे प्रश्न कौशल्य तपासण्यासाठी आहे.

**गुणदान :**
- सर्व वाक्ये प्रश्नार्थी आहेत आणि सर्व वाक्यांच्या शेवटी प्रश्नचिन्हे दिली आहेत याची खात्री करावी.
- तसेच प्रश्न चित्रातील व्यक्तींच्या कामाशी संबंधित आहेत याची खात्री करावी.
- एकाच स्वरूपाचे जास्त प्रश्न विचारल्यास त्या सर्व प्रश्नांना मिळून एकच गुण द्यावा.
  उदा. एका पंक्चरचे किती रुपये घेता? दोन पंक्चरचे किती रुपये? इत्यादी.
- प्रत्येक बरोबर प्रश्नास एक गुण द्यावा. प्रमाण लेखनाची अपेक्षा करू नये.
- प्रश्नचिन्ह नसल्यास एकूण गुणांपैकी अर्धा गुण कमी करावा.

**प्रश्न १२) खालील चित्र पहा आणि त्यावर एक गोष्ट लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखी)

**उद्दिष्ट :** मुलांची अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :** लेखन नियमांनुसार तपासू नये.

| गुण | निकष |
|---|---|
| ० | केवळ शब्द लिहिणे किंवा काहीही न लिहिणे. |
| १ | यांत्रिकरित्या एकच वाक्य शब्द बदलून लिहिणे किंवा सुसंगत नसणारे विस्कळीत लेखन. |
| २ | त्रोटक किंवा अर्ध्यामुर्ध्या शब्दातील लेखन. वाक्यरचना काही ठिकाणी तरी नीट आहे. |
| ३ | संपूर्ण चित्राचा एकत्र विचार करून सलगपणे केलेले अर्थपूर्ण लेखन. पण गोष्ट असेल असे नाही. |
| ४ | चित्राच्या तपशिलात भर घालून, चित्रातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. |
| ५ | चित्राच्या तपशिलात भर घालून, चित्रातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. पात्रांच्या तोंडी संवाद/बोलणे घातले आहे. |



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 3/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

## संच : अ

**तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : १०**

**तोंडी प्रश्न १) खालील उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यासाठी सूचना :**

- हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना** : हा उतारा व्यवस्थित वाच. वाचून झालं की मी तुला काही प्रश्न विचारणार आहे. त्याची तू उत्तरं द्यायची.

**उतारा :**



***Runa Graphics :*** *Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 3/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*

## संच : अ

**वाचनासाठी गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन, वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही, वाक्यांचे परत वाचन चालेल. |

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

**गुण** **योग्य उत्तर**

**तोंडी प्रश्न २)** (१)

**तोंडी प्रश्न ३)** (२)

**तोंडी प्रश्न ४)** (२)

■■■



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 3/Sanch-A/ Proof -III/19-06-2017/GJ*